# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर  वर्ष ४ थे  अंक ३०० गुरूवार दि.२९ मे २०२५  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.


## अजित पवारांची तक्रार करू नका, त्यांच्याच मागे लागा – अमित शहा

अजित पवार यांची तक्रार घेऊन केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याकडे गेलेल्या भाजपच्या आमदारांना शहा यांनी वेगळाच सल्ला दिला आहे.

अजित पवार यांची तक्रार करू नका, उलट त्यांच्यामागे तसेच इतर सर्वच मंत्र्यांच्या मागे कामासाठी तगादा लावा. त्यामुळे अजित पवारच माझ्याकडे तक्रार घेऊन आले पाहिजे, अशा शब्दात अमित शहा यांनी भाजप आमदारांना सूचना केल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेचा लाभ घेत स्वत:चा पक्ष मजबूत करत आहेत. तो त्यांचा अधिकार असला तरी ते भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर कुरघोडी साठी आपल्या पदाधिकाऱ्यांना ताकद देत आहेत.

ही बाब गंभीर असल्याने त्यांच्या कुरघोड्यांना रोखा,



असे साकडे भाजपच्या काही आमदारांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना घातले आहे. त्याची दखल घेऊन शाह यांनी मुंबईत अजित पवारांशी सह्याद्री विश्रामगृहावर चर्चा केली, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

आपल्या आमदारांची संख्या अधिक

आपल्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करायची आहे. त्यामुळे महायुती म्हणून सर्वांना सोबत घेऊन काम करायला हवे. आपल्या आमदारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे कामासाठी त्यांच्यामागे तगादा लावा.

त्यामुळे तेच तक्रार घेऊन माझ्याकडे आले पाहिजे, असा कानमंत्र अमित शहा यांनी सर्व आमदारांना दिला आहे. आपल्या आमदारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे मागे हटू नका, प्रशासन आणि सरकारी पातळीवर आक्रमकपणे कामाचा पाठपुरावा करा. असा सल्ला देखील त्यांनी आमदारांना दिला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणनीती

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी अमित शहा हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. शहा यांनी विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई अशा तीन विभागांना भेटी देऊन,

तेथील नेते पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणनीती नेमकी कशी असली पाहिजे, या विषयी काही नेत्यांशी चर्चा केली. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तेव्हा काही नेत्यांनी, आमदारांनी संधी साधून अजित पवारांच्या कार्यपद्धतीवर टीका केली होती.

## सावरकरांची 'बॅरिस्टर'डिग्री परत आणणार; मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा

मुंबई : 'स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लंडनला जाऊन ग्रेज इनमधून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. पण ब्रिटिश सरकारने त्यावेळी त्यांना पदवी व सनद दिली नव्हती. आता महाराष्ट्र सरकार मुंबई विद्यापीठाच्या मदतीने स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'बॅरिस्टर' ही पदवी आणि सनद सन्मानपूर्वक भारतात यावी, यासाठी प्रयत्न करणार आहे', अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला मुंबई विद्यापीठात स्वा. सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. 'स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर मिळवलेली सनद त्यांना देण्यात आली नव्हती. हा त्यांच्या बुद्धिमत्तेवरचा अन्याय होता. तसेच, ब्रिटिश साम्राज्याशी एकनिष्ठ राहण्याची शपथ न घेता त्यांनी जाज्वल्य देशभक्तीचे उदाहरण दिले. मात्र, आता राज्य सरकार ही सनद आणि पदवी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. मुंबई विद्यापीठाने त्यासाठी आवश्यक कागदपत्रे तयार करावीत', अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी केली.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लंडनमध्ये जाऊन 'ग्रेज इन' येथून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले होते. मात्र, बॅरिस्टर किंवा 'बार ट लॉ' ही सनद मिळवण्यासाठी त्यावेळी ब्रिटिश साम्राज्याशी आणि ब्रिटिश राजाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत होती. ही शपथ घेण्यास नकार दिल्याने स्वा. सावरकर यांना ही सनद व पदवी प्रदान करण्यात आली नव्हती, असा उल्लेख अनेक चरित्रांमध्ये येतो. 'माझी जन्मठेप' या स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रपर ग्रंथातही त्यांनी असाच उल्लेख केला होता.

सावरकरांच्या कार्याचे आणि वचनबद्धतेचे कौतुक

मुंबई विद्यापीठ स्वातंत्र्यवीर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. 'स्वातंत्र्यवीर सावरकर हे थोर विद्वान, कवी, इतिहासकार, पुरोगामी विचारवंत आणि अग्रणी समाजसुधारक होते. त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रथेला पाप आणि माणुसकीवरील कलंक मानले. दलितांना मंदिरात प्रवेशासाठी त्यांनी लढा दिला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही जातीभेद निर्मूलनासाठी सावरकरांच्या कार्याचे आणि वचनबद्धतेचे कौतुक केले होते', अशी भावना राज्यपालांनी व्यक्त केली.

## द्रमुकने शब्द पाळला! अभिनेता कमल हासन राज्यसभेवर जाणार

तामिळनाडूच्या सत्ताधारी द्रमुकने बुधवारी घोषणा केली की, ते १९ जून रोजी होणाऱ्या द्वैवार्षिक राज्यसभा निवडणुकीसाठी राज्यातील सहा जागांपैकी चार जागांवर निवडणूक लढवतील. द्रमुकने तीन जागांवर आपले उमेदवार उभे केले आणि एक जागा सहयोगी अभिनेता–राजकारणी कमल हासन यांच्या नेतृत्वाखालील मक्कल निधी मय्यम (एमएनएम) यांना दिली. द्रमुकने वरिष्ठ सभागृहातील आपले विद्यमान



सदस्य, वरिष्ठ वकील पी. विल्सन यांना पुन्हा उमेदवारी दिली. याशिवाय, सलेम नेते एस. आर. शिवलिंगम यांनाही पक्षाने उमेदवारी दिली. यासह कवी, लेखक आणि पक्षाचे पदाधिकारी रुकैया मलिक उर्फ कविगनार सलमा यांनाही तिकीट देण्यात आले. आसाममधील बिरेंद्र प्रसाद बैश्य (भाजप) आणि मिशन रंजन दास (भाजप) यांचा कार्यकाळ १४ जून रोजी संपत आहे.

## आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले


### जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा

लातूर :- जिल्ह्यात सुरु झालेल्या मॉन्सूनपूर्व पावसाने पिकांचे नुकसान झाले आहे.मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने लातूर शहरातील अनेक भागातील घरांमध्ये पाणी शिरले असून रस्त्यांवर पाणी जमा झाल्याचे दिसून आले. अशा परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले.पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या निर्देशानुसार तातडीने दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त देविदास काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

लातूर शहरात मुसळधार पाऊस झाल्याने रस्त्यावर आणि शहरातील सकल भागात पाणी जमा झाले. अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याचे दिसून आले. शहरात उद्भवलेल्या या परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या घरांचे तातडीने पंचनामे करून त्यांना शासकीय नियमानुसार आवश्यक मदत उपलब्ध करून देण्याची कार्यवाही गतीने करावी. मॉन्सूनपूर्व पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेवून महानगरपालिकेने शहरातील सर्व नाले, गटारी यांची सफाई मोहीम हाती घ्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई व हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. शहरातील झोन निहाय पथके स्थापन करण्यात आली असून ही पथके प्रत्यक्ष फिल्डवर जावून काम करतील, याची खातरजमा केली जावी. सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

पावसामुळे नुकसान झालेल्या पूल, रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक पूर्ववत करावी. आगामी काळात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास नदी काठच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याविषयी सूक्ष्म नियोजन करावे. पाटबंधारे विभागाने सिंचन प्रकल्पातील विसर्ग करण्यापूर्वी नदी काठावरील गावांना त्याबाबत माहिती देण्यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत पुरामुळे जीवित हानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. पावसाळ्यात वीज पुरवठा सुरळीत सुरु राहावा, यासाठी महावितरणने विशेष मोहीम राबवून आवश्यक दुरुस्त्या कराव्त. वीज पडून मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना तातडीने शासकीय मदत देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

लातूर व उदगीर शहरात अवकाळी पावसामुळे झालेले नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. शहरातील सांडपाणी वाहून नेणारे गटारे साफसफाई करावी. तसेच विद्युत खांब, रोहीत्रांची तातडीने करावी. वीज पडून गंभीर जखमी व मृत्युमुखी पडलेल्यांना व्यक्तींना तात्काळ आर्थिक मदत उपलब्ध द्यावी. तसेच अहमदपूर तालुक्यातील





सुनेगाव संगवी, आनंदवाडी, अहमदपूर रस्ता व पुलाचे काम त्वरित करण्याच्या सूचना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिल्या.

लातूर शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने अनेक भागात घरात पाणी शिरल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. तसेच रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. भविष्यात असा प्रकार घडू नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने नाले, गटारी स्वच्छतेची मोहीम तातडीने हाती घ्यावी, असे आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.

पावसामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा वाहून गेल्याने अनेक शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. रस्ते, पुलांचे नुकसान झाल्याने वाहतुकीवर परिणाम होत असल्याने दुरुस्तीची कामे लवकरात लवकर हाती घ्यावीत, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले.

अनेक गावांमध्ये पावसाच्या पाण्यामुळे नदी, ओढ्या काठावरील शेतजमीन खरडून गेली असून काही गावांमध्ये घरांचीही पडझड झाली आहे. याचे नुकसानीचे पंचनामे तातडीने होणे गरजेचे असून नागरिकांना लवकरात लवकर मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्युत तारा तुटल्यामुळे काही ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला असून वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणने तातडीने कार्यवाही करावी, असे आमदार अभिमन्यू पवार म्हणाले. यावेळी सर्व लोकप्रतिनिधींनी आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने सूचना मांडल्या. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. लातूर शहरात नागरिकांच्या मदतीसाठी आणि नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी विविध पथके स्थापन केली आहेत. तसेच जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. जिल्ह्यात झालेल्या पिक नुकसानीची माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच वीज पडून मृत्युमुखी पडलेल्य व्यक्तींच्या नातेवाईकांना तातडीने मदत देण्यात येत असल्याचे सांगितले.

## लातूर शहरातील अतिवृष्टी ग्रस्ताना आर्थिक मदत करण्याची व्ही एस पँथर्स ची मागणी!!

लातूर :-येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली २७ मे रोजी लातूर शहरामध्ये अतिवृष्टीमुळे शहरातील गाव भाग, पूर्व भाग आणि शहराच्या इतर काही भागामध्ये नागरिकांच्या घरात पाणी घुसल्यामुळे खूप नुकसान झाले आहे ,गोरगरीब लोकांच्या घरात पाणी शिरल्याने संसारउपयोगी साहित्य खराब झाले आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून आपत्तीग्रस्त लोकांना तातडीची आर्थिक मदत करावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे कडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके मार्गदर्शक रवी कुरील संपर्कप्रमुख आनंद जाधव जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे अजहर शेख सह आदी जण उपस्थित होते.

## प्रताप सरनाईकांकडून सरकारी निधीचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर; भाजपच्या जिल्हाध्यक्षाचा आरोप'

ठाणे : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वतःच्या फायद्यासाठी सरकारी निधीचा वापर केला असल्याने, महायुती सरकारची बदनामी होत असल्याचा गंभीर आरोप मिरा–भाईंदर भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे. यापूर्वी शिवसेनेकडूनही भाजपच्या एका नेत्यावर असाच पत्राद्वारे आरोप करण्यात आला होता.

दरम्यान, प्रताप सरनाईक यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. मिरा–भाईंदरमध्ये भाजप आणि शिवसेनेमध्ये वाद सुरू आहे. शिवसेनेकडून शहरात अनेकठिकाणी बेकायदा कंटेनर शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांच्यावर भाजपने कारवाईची मागणी केल्याने वादाला सुरुवात झाली आहे.

मागील आठवड्यात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजू भोईर यांनी भाजप आमदार नरेंद्र मेहतांवर अनेक आरोप करत, त्यांची तक्रार पत्राद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. त्यानंतर आता भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप जैन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. यात त्यांनी चेना व इतर भागात सरनाईक यांनी खासगी जमीन खरेदी करून स्वतः चा फायदा लक्षात घेऊन सुविधा पुरवण्यासाठी शेकडो कोटींचा सरकारी निधी खर्च केल्याचा आरोप केला आहे.



बदनामीविरुद्ध जैन यांना नोटीस

मेट्रो काम रोखल्याबाबत आमदार मेहतांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केल्याच्या रागातून जैन यांनी आपल्यावर बिनबुडाचे आरोप केल्याचे सरनाईक यांनी म्हटले आहे. तसेच जैन हे भाजपच्या वरिष्ठ पदावर असल्याने त्यांच्या मागणीनुसार चौकशी व्हायला हवी, असे मतही त्यांनी व्यक्त केले. तसेच जैन यांना बदनामी संदर्भात नोटीस बजावल्याचेही त्यांनी सांगितले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## मुंबईची दैना

मोसमी पावसाने दरवर्षीपेक्षा सुमारे दोन आठवडे आधीच महाराष्ट्राची सीमा ओलांडली. अंदाजित वेळेपेक्षा आठ दिवस अगोदर आणि मागील सोळा वर्षांच्या तुलनेत मोसमी वारे सर्वात लवकर दाखल झाले. राज्यात साधारणपणे मोसमी पाऊस ७ जूनला येतो; पण यावेळी तो अगोदरच आला. यंदाचा पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत १०५ टक्के पडेल, असा अंदाज आहे; मात्र मे महिन्यातच यापूर्वी अनेक वर्षांत पडला नाही इतका पाऊस पडला आणि मुंबईची तुंबई झाली. पुण्यासारख्या शहरातही अनेक ठिकाणी पाणी तुंबून झालेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांची दैना झाली. राज्यातील आपत्तिप्रवण भागांचे अद्ययावत नकाशे हवाई दलास द्यावेत आणि महापालिकांनी रस्त्यांची कामे करताना लावलेले अडथळे पावसाळ्यापूर्वी काढून टाकावेत. तसेच नालेसफाईची कामे लवकरात लवकर आटोपावीत, अशा स्पष्ट सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या होत्या; पण राज्यातील अन्य महापालिकांचे व ग्रामीण भागाचे सोडाच, राजधानी मुंबईतही कामे ठीक पद्धतीने झाली नसल्यामुळे मुंबईकरांची तारांबळ उडाली.

पावसाळ्यापूर्वी सर्व प्रकारचे नियोजन झाल्याचे दावे फुसकेच ठरले. मुंबईत सोमवारी झालेला पाऊस हा १०७ वर्षांतील एकाच दिवसात झालेला विक्रमी पाऊस होता. केवळ तीन तासांत १०५ मिलिमीटर पाऊस पडला, तर उपनगरांत ५५ मिलिमीटर. त्यामुळे ढगफुटीसदृश परिस्थिती तयार झाली होती. सोमवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत २४ तासांत १४४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मुंबई महापालिकेच्या माहितीनुसार, रविवारी रात्री ११ वाजल्यापासून ते सोमवारी सकाळी ११ वाजेपर्यंत दक्षिण मुंबईत २५२ मिलिमीटर पाऊस पडला. गेल्या २५ वर्षांतील मे महिन्यातील हा सर्वाधिक पाऊस होता. विज्ञान कितीही प्रगत झाले असले, तरीही निसर्गाची सर्व गुढे अद्याप माणसाला उमगलेली नाहीत. त्यामुळे पाऊस इतक्या मोठ्या प्रमाणात पडेल, असा अंदाज कोणीही व्यक्त केला नव्हता. गेल्या काही वर्षांत पावसाचे निकष बदलले आहेत, हे खरे; पण तरीही २००५ च्या महापुरामुळे मुंबईत असे काहीही घडू शकते, याचा अंदाज येणे आवश्यक होते. त्यावर्षी महापुरात अनेकांचे बळी गेले. त्यापैकी काहीजणांचा तर कारमध्ये गुदमरून मृत्यू झाला.

यावेळी कामे कशी गतिमान पद्धतीने सुरू आहेत, असे मुंबई महापालिकेतर्फे सांगितले जात होते. प्रत्यक्षात मुंबई महापालिकेच्या मुख्यालयासमोरच पाण्याचे तळे निर्माण झाले आणि मंत्रालय परिसरातही असेच दृश्य होते. मुंबई महानगर परिसर 'ग्रोथ हब' म्हणून विकसित केला जात असून, त्यास २०४७ पर्यंत दीड लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे क्षेत्र बनवण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. मुंबई मेट्रो, रेल्वे या सर्वांचा विकास करून जगात मुंबईला महत्त्वाचे स्थान देण्याचे ध्येय जाहीर करण्यात आले आहे; पण शेअर बाजार, चर्चगेट व सीएसएमटी स्थानके आणि मोठमोठ्या कंपन्यांची हेडक्वार्टर्स असलेला आलिशान इमारतींचा नरीमन पॉईंट परिसरही पाण्याखाली गेला. या महानगराच्या बशीच्या आकाराच्या भौगोलिक रचनेमुळे सखल भागात दरवर्षी पाणी साचते. त्यावरील उपाययोजना म्हणून महानगरपालिकेने ब्रिमस्टोवॅड प्रकल्पावर आतापर्यंत चार हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च केला.

नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण यासह अन्य कामे केली जात आहेत. त्यासाठी 'व्हीजेटीआय'सारख्या संस्थेचा सल्लाही घेण्यात आला. सांडपाण्याचा निचरा करणारी ड्रेनेजची व्यवस्था अनेक ठिकाणी १०० वर्षांहून जुनी आहे. यात सुमारे दोन हजार किलोमीटरचे उघडे नाले आणि ३० हजार पाण्याची प्रवेशद्वारे आहेत. ४४० किलोमीटरचे बंद नाले आणि १८६ आऊटफॉल्स नाले आहेत. आठ ठिकाणी पर्जन्यजल उदंचन केंद्रे उभारली जात आहेत. पाण्यासारखा पैसा खर्च होऊनही पाणी साठण्याची ठिकाणे कमी न होता, ती वाढतच चालली आहेत. ग्रँट रोड येथील नाना चौक तसेच परळमधील हिंदमाता भागातही नेहमीप्रमाणे गुडघाभर पाणी साचले. हिंदमाता परिसरात भूमिगत टाक्या उभारण्यात आल्या. साचणारे पाणी पंपाद्वारे टाकीत साठवण्याची व्यवस्था झाली. या सर्व तांत्रिक गोष्टींमुळे पाणी साचणार नाही, असे केले गेलेले दावे पोकळच ठरले.

थाटामाटात सुरू झालेल्या मेट्रो-३च्या वरळीतील भूमिगत स्थानकातही पाणी भरल्यामुळे वाहतूक थांबवावी लागली. कफ परेड ते आरे मेट्रोच्या तीन मार्गिका पाण्याखाली गेल्या. त्यातही वरळीच्या आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकाला धबधब्याचे स्वरूप प्राप्त झाले. वास्तविक दुसरा टप्पा सुरू होऊन दोन आठवडे होत नाहीत, तोच मेट्रोच्या या स्थानकात पावसाचे प्रचंड पाणी आल्यामुळे या कामाच्या दर्जाबद्दल सवाल उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मुळात मुंबईतील पावसाळापूर्व नालेसफाईची कामे पूर्ण झालेली नाहीत. एकाच वेळी शहरभर काँक्रिटीकरणाची कामे घेण्यात आली. ठिकठिकाणी खड्डे खणले गेल्यामुळे लाखो नागरिकांना महिनोनमहिने त्रास सहन करावा लागत आहे. सरसकट काँक्रिटीकरणामुळे जमिनीत पाणी झिरपत नाही. उलट ते साचून राहते. जागोजागी रस्त्यांवर पडणार्‍या खड्ड्यांमुळे टीका होऊ लागल्याने छोटे-छोटे रस्तेही काँक्रीटचे करण्यात आले, हीच मुळात चूक होती. तसेच भूमिगत मेट्रो सुरू केल्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यात बाधा येते काय, हाही प्रश्न आहे.

आपत्ती निवारण कक्ष, वॉर रूम, एआयमार्फत नियंत्रण वगैरेंच्या बाता मारल्या जात असल्या, तरीही पालिकास्तरापासून ते मंत्रालयापर्यंत ठिकठिकाणी नियोजनाचा गलथानपणाच दिसून येतो. नागरी सुविधांच्या प्रश्नांवरही एकमेकांकडे बोटे दाखवण्याचे क्षुद्र राजकारण केले जाते. मुंबई शहर नियोजन त्यामुळे उघडे पडले. राजधानीचीच ही अवस्था झाल्यावर अन्य छोट्या-मोठ्या शहरांची काय स्थिती होत असेल, याची केवळ कल्पनाच केलेली बरी! महापालिका, नगरपालिकांच्या शहरांत हेच चित्र दिसून आल्याने नागरिकांची दैना उडाली. अनेक शहरांत ऐन पावसाळ्यात रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. संबंधितांना विचारणार तरी कोण? पावसाने शेतीला मोठा फटका बसला. कोकणासह राज्यातील पर्यटन ऐन हंगामात ठप्प पडले. शेतकर्‍यांना या स्थितीत मदतीचा हात दिला पाहिजे.

# मान्सूनचा तडाखा

यंदा मान्सून अपेक्षेपेक्षा खूपच लवकर दाखल झाला. केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्यानंतर केवळ २४ तासांत तो महाराष्ट्रात दाखल झाला. महाराष्ट्रात सगळीकडे मान्सूनपूर्व पावसाचे वातावरण सुरू असताना आणि त्या पावसाने बर्‍याच भागाला तडाखा दिलेला असताना अचानक आलेल्या मान्सूनने सगळीकडेच दैना उडाली. ठिकठिकाणी या पावसाने दिलेला फटका मोठा आहे. पूर्वी कायम पावसाची प्रतीक्षा करायला लागणार्‍या भागातसुद्धा या पावसाने रौद्ररूप धारण केले आणि भिगवण, बारामती, सोलापूर, बार्शी अशा पर्जन्याचा अभाव असलेल्या भागात चक्क रस्त्यावर नद्या वाहू लागल्याचे दृश्य आपल्याला पाहायला मिळाले.

या पहिल्याच पावसात उजनी धरणाचा उपयुक्त साठा प्लसमध्ये गेल्याचीही बातमी प्रसिद्ध झाली आहे. मान्सूनचे आगमन एरवी सुखद मानले जाते, पण यावेळी मात्र या पावसाने जबरी तडाखा दिलेला दिसला. या मान्सूनमुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला तर प्राथमिक



माहितीनुसार राज्यातील तब्बल ३२ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिके नष्ट झाली असून राज्यातल्या ४२५ महसूल मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. राज्याच्या अनेक भागात याआधीच मान्सूनपूर्व पाऊस थैमान घालत होता. त्यात अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले.

तेथील सुमारे १३ हजार हेक्टरवरील मूग, कांदा, ज्वारी, केळी, संत्री अशा पिकांचे नुकसान झाले. त्या खालोखाल जळगाव आणि नाशिकलाही मान्सूनपूर्व पावसाने तडाखा दिला होता. तेथील सुमारे ३२०० हेक्टर क्षेत्रावरील पिके नष्ट झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या मान्सूनपूर्व पावसाचे थैमान सुरू असतानाच साक्षात मान्सूनही ठिकठिकाणी इतका बरसला की त्यामुळे अनेक ठिकाणी पूरजन्यस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. रेड अलर्टमुळे राज्याच्या विविध भागात एनडीआरएफची पथके तैनात करण्याची वेळ आली. अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली असून मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक अशा महानगरांमध्ये नालेसफाईचे पितळ उघडे पडले आहे.

काल महानगरी मुंबईला अभूतपूर्व पावसाने झोडपले. त्यामुळे तेथेही पहिल्याच पावसात मोठी वाताहत झाल्याचे पाहायला मिळाले. याचा मुंबई मेट्रोला मोठा तडाखा बसला. मेट्रोच्या तीन मार्गाला बसलेल्या तडाख्यामुळे तेथील काही स्थानकांमध्ये पाणी शिरले आणि मेट्रो वाहतुकीची वाट लागली. काल मुंबई तुंबली आणि आज लगेच त्यावरून राजकारण सुरू झाले. पावसाळी कामांसाठी खर्ची घातलेले हजारो कोटी रुपये कोठे गेले, पहिल्याच पावसात मुंबईची इतकी दैना कशी उडाली, असे प्रश्न ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस पक्षाने उपस्थित केले. त्यावर लगोलग भाजपकडून पूर्वीचेच छापील साच्यातील उत्तर दिले गेले.

मुंबई महापालिकेवर ज्यांची पंचवीस वर्षे सत्ता होती त्यांच्या गैरकारभारामुळेच मुंबई तुंबल्याचा आरोप भाजपकडून केला गेला. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हजारो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. संजय राऊत यांनी भाजपवर ३५ हजार कोटी रुपयांचा मलिदा खाल्ल्याचा आरोप केला, तर भाजपच्या आशिष शेलार यांनी ठाकरे सेनेवर एक लाख कोटी रुपयांच्या गफलतीचा आरोप केला आहे. लोकांना आता असल्या आरोप-प्रत्यारोपांची नुसती सवयच झालेली नाही, तर त्याचा उबगही यायला लागला आहे. पण त्यातून मुंबईची परिस्थिती काही सुधारताना दिसत नाही.

पहिल्याच पावसात मुंबईला एवढा मोठा तडाखा बसला असेल, तर मग पावसाळ्याची दक्षता म्हणून जे पैसे खर्च केले त्याचा नेमका परिणाम काय झाला, याचे उत्तर देण्याची जबाबदारी आता भारतीय जनता पक्षाची आहे. पुण्यातही मान्सूनने मोठा तडाखा दिला असून या शहरातही नालेसफाईच्या कामाचा बोजवारा उडत असल्याचे दिसू लागले आहे. शहराच्या अनेक भागात रस्त्यावर साठलेल्या प्रचंड पाण्यामुळे वाहतूक तर कोलमडलीच, पण पुन्हा शहरात खड्ड्यांचे साम्राज्य उद्भवण्याची चिन्हेही दिसू लागली आहेत. पावसाच्या राज्यभरातील या ठिकठिकाणीच्या बातम्या वाचल्यानंतर आणि त्यातून झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतल्यानंतर राज्य सरकारला या पावसाळ्यात आता अधिक जागरूकपणे आपली यंत्रणा सतर्क करावी लागणार आहे.

नुसतं अधिकार्‍यांना सतर्क राहण्याची सूचना देऊन मंत्र्यांना नामानिराळे राहता येणार नाही, तर प्रत्यक्ष मैदानावर उतरून त्यांना या परिस्थितीवर देखरेख ठेवावी लागेल. पुणे जिल्ह्यात पावसाने जी दाणादाण उडाली त्याबाबतीत उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन पाहणी करताना आढळले. ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्याची ग्वाहीसुद्धा त्यांनी दिली आहे हे चांगले झाले, पण राज्याच्या अन्य भागातही राज्य सरकारने अशीच तत्परता दाखवणे अपेक्षित आहे. राजकीय हिशेब तुम्ही निवांतपणे चुकता करा पण आपत्तीच्या काळात मात्र आपले सगळे लक्ष लोकांची गैरसोय दूर करण्याकडे ठेवा असे त्यांना निक्षून सांगण्याची वेळ आली आहे.


राज्य सरकारच्या तिजोरीत सध्या खडखडाट असल्याच्या बातम्या यापूर्वी अनेक वेळा येऊन गेल्या असल्या तरी आता पिकांचे नुकसान झालेल्या शेतकर्‍यांना मदतीचा हात देणे, ज्यांच्या घरांचे नुकसान झाले आहे अशा नागरिकांना मदत करणे यासाठी सरकारला पुरेशी आर्थिक तजवीज करावी लागेल. केवळ तोंडी वाफ दवडून त्यांना जनतेला वार्‍यावर सोडता येणार नाही. महानगरांमध्ये पावसामुळे होणारी दैना दुरुस्त करण्याचे काम केवळ त्या त्या महापालिकांच्या अधिकार्‍यांवर सोपवून चालणार नाही. तेथेही तातडीच्या आर्थिक मदतीची तत्परता राज्य सरकारला दाखवावी लागणार आहे. मान्सूनचे आगमनच इतके नुकसानकारक झाले असेल, तर अजून जून महिनासुद्धा उजडायचा आहे, अजून यापुढचे चार महिने अशा आपत्ती वारंवार उद्भवणार आहेत याचे भानही सरकारला ठेवावे लागेल.

# कौटुंबिक हिंसाचार आणि न्याय

कौटुंबिक हिंसाचार कायदामधील प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार उच्च न्यायालयाला आहेत. मात्र, जर सदर प्रक्रियेमध्ये विशेष निष्काळजीपणा असेल अथवा अन्याय होत असेल तरच हस्तक्षेप करावा.

१९ मे २०२५ रोजी सौरभ कुमार त्रिपाठी विरुद्ध विधी रावल या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण असा २३ पानी निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय एस. ओका यांच्या खंडपीठाने कौटुंबिक हिंसाचार कायद्याद्वारे दाखल अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ किंवा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम ५२८ अन्वये रद्द करता येऊ शकतो, असे सांगून उच्च न्यायालयांनी त्यासाठी हस्तक्षेप करताना खूप काळजी घेतली पाहिजे, असे मत व्यक्त केले आहे. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचा इंदूर खंडपीठाचा निर्णय रद्द केला आहे व सदर अर्ज पुन्हा पूर्ववत करून निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत.

कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ हा मुळात महिलांची सुरक्षितता जपता यावी, त्यांचे विवाहानंतरचे अधिकार संरक्षित व्हावेत या उदात्त हेतूने बनवण्यात आला आहे. सदर कायद्यातील विविध कलमांचा विचार केला असता बहुतांश कलमे दिवाणी स्वरूपाची आहेत तर काही कलमे फौजदारी आहेत. त्यामुळे या अगोदर विविध निकालात कौटुंबिक हिंसाचार कायद्यात उच्च न्यायालयाला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ नुसार हस्तक्षेप करता येऊ शकतो असेही निकाल झाले, तर काही खटल्यात उच्च न्यायालयाला असा हस्तक्षेप करता येणार नाही, असेही निकाल झाले. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्या सर्व निकालांचा ऊहापोह या निकालात करून प्रत्येक खटल्याची परिस्थिती वेगळी होती कलमे वेगळी होती त्यानुसार निकाल दिले गेले.



शेवटी न्यायाधीश देखील शेवटपर्यंत शिक्षणाच्या प्रक्रियेत असतात असे सांगून काही निर्णय चुकतात तेव्हा जास्तीच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार चालायचे असते. असे सांगून कौटुंबिक हिंसाचार कायद्याच्या विविध कलमांचे सविस्तर विवेचन करून अगदी एखाद्या कायद्याचा दुरुपयोग होत असेल अथवा अतिशय चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल होत असेल तर अशा वेळी उच्च न्यायालय फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ व आताचे भारतीय सुरक्षा संहिता कलम ५२८ अन्वये सदर प्रक्रिया रद्द केली जाऊ शकते असा महत्त्वपूर्ण निकाल खंडपीठाने दिला आहे.

खटल्याची पार्श्वभूमी अशी की, प्रतीक त्रिपाठी याचा विवाह हिंदू विवाह पद्धतीने विधी रावल हिच्याबरोबर १२ डिसेंबर २०१९ रोजी मध्य प्रदेशातील देवास येथे झाला. दोन वर्षांनंतर ८ डिसेंबर २०२१ रोजी पत्नी विधी रावल हिने देवास पोलीस ठाणे तसेच महिला मार्गदर्शन केंद्र येथे पती, दीर, सासू, सासरे यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली की, मी दक्षिण आफ्रिकेतून आल्यावर मला हुंड्यासाठी २० लाख रुपये व एका कारसाठी सासरच्या लोकांनी छळ केला. त्यानुसार सासू, सासरे, दीर व पतीविरुद्ध देवास येथे कलम ४९८ अ, ५०४, ५०६ व ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचप्रमाणे तिने मला परदेशात असताना माझ्या पतीने मारून घरातून बाहेर काढले होते म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय देवास यांच्याकडे कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ कलम १२ अन्वये अर्ज दाखल केला व त्यामध्ये कलम १८, १९, २०, २१, २२ व २३ नुसार मागण्या केल्या.

त्यानंतर तिचा दीर सौरभ कुमार याने तसेच पती व सासू, सासरे यांनी दोन याचिका उच्च न्यायालयात दाखल केल्या. त्यानुसार त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ नुसार कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२ नुसार तक्रारदाराने केलेला अर्ज प्रक्रिया रद्द करण्यात यावी अशी मागणी केली. सदर मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली व सांगितले की सदरचा कलम १२ खालील अर्ज हा दिवाणी स्वरूपाचा असल्याने उच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करता येणार नाही. असे सांगून सदर याचिका न्यायालयाने फेटाळल्या. त्यावर दुःखी झालेल्या कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयात या उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात दाद मागितली.

आपिलार्थी यांनी सर्वोच्च न्यायालयात वकिलांनी युक्तिवाद करताना अलाहाबाद उच्च न्यायालयात देवेंद्र आगरवाल विरुद्ध उत्तर प्रदेश २०२४ ची याचिका तसेच मुंबई उच्च न्यायालय नंदकिशोर प्रल्हाद व्यवहारे विरुद्ध मंगला तसेच अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठाने राम लोतन विश्वकर्मा विरुद्ध उत्तर प्रदेश व इतर, २०२५ ई खटल्यात उच्च न्यायालयाला सदर प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार असल्याचे दाखले दिले. तर प्रतिवादीतर्फे सांगण्यात आले की उच्च न्यायालयाने सदर प्रक्रिया दिवाणी स्वरूपाची असल्याने उच्च न्यायालयाने योग्य निकाल दिला असून त्यासाठी प्रतिवादीतर्फे कुणाप्पारेड्डी ऊर्फ नुकाला शंका बालाजी विरुद्ध कुन्नाप्पा रेड्डी स्वर्णकुमारी व इतर या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ चे कलम १२ प्रक्रिया दिवाणी स्वरूपाची असून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ द्वारे ती रद्द करता येणार नाही असे सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व खटल्यांचा व कलम ४८२ तसेच कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२ त्यातील तरतुदी यांचे सविस्तर विश्लेषण करून फौजदारी न्यायालय, दिवाणी तरतुदी याबाबत सविस्तर विश्लेषण करून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय एस. ओका म्हणजे याच खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयात २७ ऑक्टोबर २०१६ रोजी याचिका २४७३ मधे न्यायालयाला कलम ४८२ अंतर्गत कौटुंबिक हिंसाचार कायदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार नाहीत हा दिलेला चुकीचा निर्णय जास्तीच्या खंडपीठाने दुरुस्त केला असेही सांगितले. सर्व बाबींचे विश्लेषण करून सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की उच्च न्यायालयाला कौटुंबिक हिंसाचार कायदा मधील प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार आहेत. मात्र, उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून प्रक्रिया रद्द करताना जर सदर प्रक्रियेमध्ये विशेष निष्काळजीपणा असेल अथवा अन्याय होत असेल तरच हस्तक्षेप करावा, असे सांगून या खटल्यात अपीलकर्त्यांचे अपील मंजूर केले गेले व त्याचा अर्ज पुन्हा पूर्ववत करण्याचा तसेच त्याची सुनावणी करण्याचा आदेश उच्च न्यायालयाला या खंडपीठाने दिला आहे.

# लेक माहेऱ्चा कट्टा आयोजित नारी रत्न पुरस्काराचे पुणे येथे वितरण संपन्न

केज / प्रतिनिधी पुणे येथे लेक माहेरचा कट्टा आयोजित एल .म.के.२०२५ चा पुरस्कार केज येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधवांना देण्यात आला आहे.

लेक माहेरचा कट्टा आयोजित नारी रत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नारायण जायभाये सर,हनुमंतराव गायकवाड सर,कर्नल महादेवराव घुगे,जयमाला ताई इनामदार,प्रा डॉ.संजय बी चोरडिया,सौ सुषमा चोरडिया ,संतोष रामकृष्ण साळुंके, उज्वला मेश्राम ,सर्वेश जाधव (शेफ),राहुल निरंजन खिचडी संगीता जुमडे, तेज पंचाल तसेच लेक माहेरचा कट्टा च्या संस्थापक अध्यक्ष सौ.सारिका प्रमोद ढाणे, सौ.कविता सुनील कोंडभर, सौ.पूनम अमोल दुसाने, सौ.वर्षा रमेश नागरे,सौ.दीपाली गोळे मोरे, सौ.दीपाली बिरादार, सौ गौरी अमोल तटकरे ,

विशेष सहकार्य,तेज पांचाल,संगीता जुमडे,उज्वला मेश्राम,विशाल ज्ञानोबा पांचाळ ( सामाजिक कार्यकर्ते तथा पंकजाताई मुंडे विश्वासु कार्यकर्ते)अजित कुमार

सौ.अमृता विनायक बाचल सौ. शिवकन्या सविता तुषार मोढवे, सौ.अक्षता अजय धयाळकर. (कालिंदी रामा नाचणकर)

सौ.आशू अमोलराव गाडे,

सौ.रुपाली विनोद कोतकर

रावेत, सौ.अर्चना निलावर , पिंपळे सौदागर, सौ.वैशाली परेश लष्करे वारजे, सौ. प्रिया राज खंडारे

चिंचवड, सौ. स्मिता महेश गिरनारे, पुण,अजित कुमार

या कार्यक्रमासाठी मिडिया प्रमुख प्रतिनिधी म्हणून राहुल निरंजन खिचडी, डी टी व्ही न्यूज मराठी मुख्य संपादक ,आप्पा साहेब शेळके एबीपी माझा बालाजी सूर्यवंशी ,साम टिव्ही

ओमकार कुलकर्णी , वसंतराव काळकुटे टीव्ही९ मराठी बीड जिल्हा प्रतिनिधी श्रीराम विठ्ठल शिरसागर टीव्ही९ मराठी धाराशिव,उदय साबळे ,जय महाराष्ट्र न्यूज ( धाराशिव )डॉ.कविता राणे


( अँकर ) ( मुंबई ) वसंत सोनवणे जनहित मराठी न्यूज संपादक, तात्या गवळी आदर्श क्रांती मराठी न्यूज संपादक,मुबाशिर खतीब बीड न्यूज वन संपादक, अशोक नागरगोजे बीड युवामत संपादक ,या सर्व पत्रकार बंधूंचे तसेच माझ्या विनंतीला मान देऊन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलात त्या मान्यवरांचे मनापासून आभार मानुन पुरस्काराचे वितरण करण्यात आले यामध्ये प्रामुख्याने




पुरस्कार्थी सौ.स्वप्ना कुंभार शिक्षिका,निवेदिका, मराठी सौ.यशोदा पाटील,शिवव्याख्याता, निवेदिता. सौ.दिपाली राणे, उद्योजिक.सौ.शुभांगी देशमुख ,उद्योजिका, नवी मुंबई.सौ.उर्मिला बोरसे , ज्योतिषी , पनवेल ,सौ.सोनाली बंडगर ,उद्योजिका, पिंपरी चिंचवड,सौ.आरती बनसोडे , समुपदेशक , भांडुप, मुंबई ,सौ.अर्चना राजपूत बिझनेस,सौ .प्राजक्ता केदार आसरकर ,बिझनेस ,सौ.जयश्री सोनटक्के, उद्योजिका, पिंपरी चिंचवड.डॉ.मनोती तळवलकर, समुपदेशक आणि मानसोपचार तज्ञ,( पुणे ),सौ.दिपाली भूषण दुर्गे,बिझनेस (पुणे),सौ.निकिता कुलकर्णी, संचालिका, समर्थ कोचिंग क्लासेस(फलटण),सौ. दीपा कोळेकर बिझनेस, सौ. संगीता बांदल, वकिल, हिंजेवाडी, पुणे. सौ.दर्शना चव्हाण, उद्योजिका – अकोले, अहिल्यानगर, सौ.मिनल गाडेकर, योगगुरू, सौ.मंगला दोरीक (पाटकर), सेवानिवृत्त शिक्षिका . नांदेड सिटी, पुणे , सौ.रिती सावंत, उद्योजिका , समाजसेविका, सौ. रश्मी बोराडे, उद्योजिका सोलापूर , कु. दिव्यानी कोळेकर , नेल आर्टिस्ट, सायली, उद्योजिका, सौ. स्वाती कदम, वकिल, सौ. मनिषा खैरे शिंदे, उद्योजिका आणि समाजसेविका ,सौ मंजुषा फुलारी, शिक्षिका ,सोलापूर, अक्षता शिंदे,मंजुषा शिंदे उद्योजिका,सौ. शितल बुले बिझनेस ,सौ.प्राजक्ता स्वप्निल चौधरी उद्योजिका, सौ. पुनम कदम, उद्योजिका,सौ.अश्विनी डगवार बिझनेस, उर्मिला छाजेड, समाजसेविका सौ.रुपाली राजपूत,बिझनेस,सौ.कांचन कोळी बिझनेस,रेश्मा गायकवाड अशा विविध क्षेत्रातील सामाजिक राजकीय व मिडिया मध्ये काम करणाऱ्या मान्यवरांचा येतोचित सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला यावेळी देशातील विविध भागातून मान्यवर मोठ्या संख्येने पुणे येथे लेक माहेरचा कट्टा आयोजित एल.एम.के. पुरस्कारचे वितरण करण्यात आले यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे लेक माहेरचा कट्टा या ग्रुपच्या फाउंडर सारिका ताई डहाणे यांनी आभार मानले व यापुढेही असेच कार्य मी पुढे करीत राहणार आहे असे मत व्यक्त केले.

## मेंदूच्या नसांना सूज आल्यानंतर शरीरात दिसून येतात ‘ही’ भयानक लक्षणे, दुर्लक्ष केल्यास गमवावा लागेल जीव

शरीरातील सगळ्यात महत्वाचा अवयव म्हणजे मेंदू. मेंदू शरीराच्या सर्व क्रियांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतो. मात्र बऱ्याचदा मेंदूसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर दुर्लक्ष केले जाते. पण वारंवार शरीरात दिसणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे शरीराला हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते. मेंदूसंबंधित कोणतीही सामान्य किंवा अतिशय गंभीर समस्या उद्भवल्यास कधीही दुर्लक्ष करू नये. मेंदूच्या नसांना सूज आल्यानंतर शरीरात अनेक गंभीर लक्षणे दिसू लागतात. याला वैद्यकीय भाषेमध्ये सेरेब्रल एडिमा असे म्हणतात. ही समस्या उद्भवू लागल्यानंतर शरीराला काहींना काही संकेत देण्यास सुरुवात करतो. मेंदूच्या नसांना सूज येण्यामागे अनेक वेगवेगळी कारणे सुद्धा आहेत. मात्र दुर्लक्ष केल्यास रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. चुकीची जीवनशैली, शरीरात सतत होणारे बदल, आहारातील बदल, कामाचा वाढलेला तणाव, अपुरी झोप आणि चुकीच्या पद्धतीने झोपल्यामुळे मेंदूच्या नसांना सूज येण्याची शक्यता असते. याशिवाय शरीरात वाढलेला रक्तदाब आणि उच्च कोलेस्ट्रॉल मेंदूच्या नसांना सूज येण्याचे प्रमुख कारण आहे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला मेंदूच्या नसांना सूज आल्यानंतर शरीरात कोणती गंभीर लक्षणे दिसून येतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. ही लक्षणे शरीरात दिसू लागल्यास तातडीने डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे.



तीव्र डोकेदुखी: डोकेदुखीची समस्या सामान्यपणे सगळेच जाणवते. पण बऱ्याचदा काहींना अतिशय तीव्र डोकेदुखी होते. डोकं दुखण्यास सुरुवात झाल्यानंतर तोंडातून शब्द उच्चाराने सुद्धा कठीण होऊन जाते. त्यामुळे अचानक जाणवत असलेली तीव्र डोकेदुखी वाढल्यास डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा. मेंदूच्या नसांना सूज आल्यामुळे तीव्र डोकेदुखी जाणवते.

झोपेची समस्या: मेंदूच्या नसांना सूज आल्यानंतर झोपेची गुणवत्ता पूर्णपणे खराब होऊन जाते. रात्रीच्या वेळी शांत झोप न लागणे, अचानक झोपेतून जाग येणे इत्यादी गंभीर लक्षणे शरीरात दिसून येतात. रात्रीच्या वेळी वारंवार झोप मोड होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन औषध उपचार करावे.

मान आखडून जाणे: रात्रीच्या वेळी झोपताना बऱ्याचदा मान आखडून जाते. पण सामान्यपणे अनेक लोक याकडे दुर्लक्ष करतात. पण मेंदूला सूज आल्यानंतर वारंवार मान आखडू लागते. याकडे दुर्लक्ष करू नये. मान आखडण्यास सुरुवात झाल्यानंतर उपचार करावे.

धुसर दिसणे: मेंदूच्या नसांना आलेली सूज बऱ्याचदा अतिशय जीवघेणी ठरते. कारण यामुळे गोष्ट डबल दिसणे किंवा धुसर दिसण्याचा त्रास होऊ लागतो. अशावेळी डॉक्टरांचा योग्य सल्ला घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार केल्यामुळे मेंदूच्या नसांना आलेली सूज कमी होण्यास मदत होईल. तसेच मेंदूच्या नसांना सूज आल्यानंतर अचानक उलट्या होऊ लागतात.

## ‘ससुराल गेंदा फूल’, सासू-सून, सासू-नणंदेच्या भांडणात कसे ठेवाल स्वतःला आनंदी, नव्या नवरीसाठी सोप्या टिप्स

सध्या वैष्णवी हगवणे प्रकरण खूपच गाजत आहे. लग्नानंतर सुनेचा छळ हे आजही दिसून येतंय. लग्नानंतर, जेव्हा मुलगी नवीन घरात जाते तेव्हा तिचे आयुष्य ३६० डिग्री बदलते. आईवडिलांच्या घरी ती ज्याप्रमाणे राहते तसं तिला नक्कीच सासरी राहता येत नाही. अरेंज मॅरेज असेल तर नव्या नवरीला अधिक दडपण असते कारण तिला सासरच्या लोकांच्या स्वभावाविषयीही माहीत नसते. यासाठी तिला तिच्या सासरच्या लोकांची मनं कशी आहेत हे समजून घ्यावे लागते, ज्यामुळे समस्या निर्माण होऊ शकतात. कधीकधी बदल एखाद्या व्यक्तीसाठी वेदनादायक असू शकतात, जसे की सकाळी लवकर उठणे, सर्वांची जबाबदारी घेणे, घर स्वच्छ ठेवणे इत्यादी गोष्टी पटकन जमू शकत नाहीत. अनेक नोकरदार महिलांना काम आणि जीवनाचा समतोल साधणे कठीण असते. या सर्व गोष्टी सांभाळताना, नवीन वधूला तिच्या सासू, वहिनी, मेहुणे आणि सासऱ्यांकडून टोमणे सहन करावे लागू शकतात. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या मानसिक आरोग्याची काळजी कशी घ्याल? आज आम्ही तुम्हाला काही अशा पद्धती सांगणार आहोत ज्यांचा अवलंब करून तुम्ही आनंदी राहू शकता मोठ्यांचा सल्ला तुमच्या सासरच्या लोकांच्या पद्धती शिकण्यासाठी तुम्ही पुढाकार घेतला पाहिजे. जर तुम्ही काहीतरी नवीन किंवा वेगळे करणार असाल तर एकदा मोठ्यांचा सल्ला घ्या. यामुळे नवीन घरात तुमचा समन्वय कायम राहील. तथापि, सर्व प्रयत्न करूनही, मतभेद होणे शक्य आहेत, अशा परिस्थितीत मध्य मार्ग शोधण्याचा प्रयत्न करा. तरीही जर गोष्टी सुरळीत झाल्या नाहीत तर तुमच्या नवऱ्याशी बोलून उपाय शोधा. नवऱ्याशी नेहमी जवळीक ठेवा तुमच्या आणि तुमच्या सासू-सासऱ्यांमध्ये वा



सासू-नणंदेसह कितीही वाद असले तरी, तुमच्या नवऱ्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवा. तुमच्या सासू आणि नणंदेच्या चुकांसाठी तुमच्या पतीला दोष देऊ नका, कारण तसे केल्यास तुमचा नवरादेखील तुमच्या विरोधात जाऊ शकतो. जेव्हा तुम्ही तुमच्या पतीसोबत बसता तेव्हा सर्व वाद विसरून जा आणि प्रेमाने बोला आणि आपल्या दोघांचा एकत्र आणि वैयक्तिक वेळ जपा माहेरी तक्रारी सांगू नका तुमच्या सासरच्या लोकांबद्दल तुमच्या पालकांकडे तक्रार करू नका कारण तुमच्यावर निंदा केल्याचा आरोप होईल आणि तुम्हाला ‘घर का भेदी’ म्हटले जाईल. सासरच्या लोकांचा प्रश्न तिथेच सोडवण्याचा प्रयत्न करणे चांगले ठरेल. तथापि, जर तुम्हाला घरगुती हिंसाचार किंवा कोणत्याही प्रकारच्या छळाला तोंड द्यावे लागत असेल तरच कठोर कारवाई करा आणि आपल्या माहेरच्या व्यक्तींची मदत घ्या दुर्लक्ष करा बऱ्याचदा तुमचे सासरचे लोक तुमच्याबद्दल किंवा तुमच्या पालकांबद्दल वाईट बोलतात, अशा परिस्थितीत, प्रतिसाद देण्याऐवजी, त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा, कारण जर तुम्हाला राग आला तर तुम्ही वाद घालायला जाल आणि हे प्रकरण वाढून अधिक दुरावा येईल आणि याचा परिणाम अधिक वाईट होऊ शकतो. ध्यानधारणा करा आनंदी राहण्यासाठी तुम्ही ध्यानधारणेची मदत घेऊ शकता, कारण तुमच्यावर टीका करणाऱ्यांचे तोंड तुम्ही बंद करू शकत नाही, स्वतःला इतके परिपक्व बनवणे चांगले की अशा गोष्टी तुमच्यावर परिणाम करणार नाहीत. तुम्ही सासरी आहात हे टेन्शन घेऊ नका. तसंच माणसं कशी वागतात यापेक्षा तुम्ही त्यांच्याशी कसे वागू शकता याकडे अधिक लक्ष द्या. आपला संसार सुखाचा करण्यासाठी आणि त्रास टाळण्यासाठी जास्तीत जास्त स्वतःकडे लक्ष द्या.

## दुपारच्या जेवणात कोकणातील पारंपरिक पद्धतीमध्ये बनवा तिळकूट गवार, तांदळाच्या भाकरीसोबत लागेल झणझणीत

दुपारच्या जेवणात अनेक वेगवेगळ्या पदार्थांची मेजवानी बनवली जाते. डाळ, भात, भाजी, चपाती किंवा भाकरी इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. कोकणात बनवले जाणारे पदार्थ जगभरात खूप जास्त प्रसिद्ध आहे. घावणे, काकडीची तौशे, भाकरी, सुरनोळी, पातोळी आणि खांडवी, सात काप्याचे घावणे इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. म्हणूनच आज आम्हीओ तुम्हाला तिळकूट गवार बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. घाईगडीबडीच्या दिवशी सकाळच्या डब्यात किंवा दुपारच्या जेवणात काय भाजी बनवावी? असे प्रश्नजार तुम्हाला पडले असतील तर तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये घरी तिळकूट गवारची भाजी बनवू शकता. कोकणी पद्धतीमध्ये बनवलेली गवारीची भाजी लहान मुलांसह मोठेसुद्धा अतिशय आवडीने खातील. चला तर जाणून घेऊया तिळकूट गवार बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य: गवार मीठ तिळकूट धणे लाल तिखट तेल लसूण कृती: तिळकूट गवार बनवण्यासाठी सर्वप्रथम, गवारीच्या भाजीचे दोन्ही बाजूने देठ तोडून घ्या.त्यानंतर मध्यम आकाराचे तुकडे करा. टोपात पाणी गरम करून त्यात बारीक करून स्वच्छ केलेली गवार टाकून एक वाफ येईपर्यंत शिजवून घ्या. पॅनमध्ये धणे, तिळकूट घालून भाजून घ्या. भाजलेले तिळकूट थंड झाल्यानंतर खलबत्यामध्ये तिळकूट, धणे, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घालून बारीक वाटून घ्या. वाफ आलेल्या गवारमधील पाणी काढून घ्या. कढईमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरून घेतलेल्या लसूण टाकून वाटून शिजवलेली गवार टाका. गवार मिक्स करून झाल्यानंतर त्यात तयार केलेला तिळकूट मसाला घालून मिक्स करा. नंतर त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली तिळकूट गवार भाजी. हा पदार्थ तांदळाच्या भाकरीसोबत अतिशय सुंदर लागतो.

## मानेवर वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी ‘या’ दोन घरगुती पदार्थांचा करा वापर, मानेवर येईल ग्लोइंग चमक

उन्हाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये आरोग्यासोबत त्वचेची जास्त काळजी घ्यावी. चेहरा सुंदर दिसण्यासाठी महिला सतत काहींना करत असतात. मात्र मान आणि शरीराच्या इतर अवयवांवरील त्वचेची काळजी घेतली जात नाही. याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मानेवरील त्वचेकडे दुर्लक्ष करू नये. बऱ्याचदा मानेवर वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी महिला सतत काहींना करत असतात. कधी ब्राइटनिंग क्रीम लावल्या जातात तर कधी बाजारात उपलब्ध असलेले वेगवेगळे प्रॉडक्ट वापरून त्वचेवरील काळेपणा घालवला जातो. मानेवर वाढलेला काळेपणा काहीवेळा नैसर्गिकरित्या सुद्धा होतो. अशावेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते उपचार करून त्वचेची काळजी घ्यावी. सुंदर आणि चमकदार चेहऱ्यासाठी महिला सतत काहींना काही लावतात. मात्र काळवंडलेल्या मानेकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नाही. काळवंडलेल्या मानेमुळे महिलानांचा आत्मविश्वास काहीसा कमी होऊन जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला मानेवर वाढलेला काळेपणा घालवण्यासाठी कोणत्या घरगुती पदार्थांचा वापर करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. हे उपाय केल्यामुळे त्वचा नैसर्गिकरित्या सुंदर आणि चमकदार होईल.




बेकिंग सोडा आणि गुलाबपाणी: बेकिंग सोड्यामध्ये असलेले गुणधर्म त्वचा चमकदार आणि उजळदार करण्यासाठी मदत करतात. त्यामुळे मानेवर वाढलेला काळेपणा कमी करण्यासाठी तुम्ही बेकिंग सोड्याचा वापर करू शकता. यासाठी वाटीमध्ये बेकिंग सोडा घेऊन त्यात गुलाब पाणी टाकून पेस्ट तयार करा. तयार केलेली पेस्ट काळवंडलेल्या मानेवर लावून हलक्या हाताने मसाज करा. यामुळे मानेवर जमा झालेली डेड स्किन निघून जाण्यास मदत होईल. बेकिंग सोड्यात असलेले अँटी बॅक्टेरिअल गुणधर्म नॅचरल एक्सफोलिएटरप्रमाणे काम करतात. १० मिनिटं झाल्यानंतर पाण्याने मान स्वच्छ करून घ्या. हा उपाय नियमित केल्यास मानेवरील काळेपणा निघून जाईल. बेसन, हळद आणि दही: बेसन, हळद आणि दही हे तीन पदार्थ त्वचेसाठी अतिशय गुणकारी ठरतात. या पदार्थांमध्ये आढळून येणारे घटक त्वचा आतून स्वच्छ करतात. यासाठी वाटीमध्ये एक चमचा बेसन घेऊन त्यात एक चमचा दही टाकून मिक्स करा. तयार केलेल्या पेस्टमध्ये चिमूटभर हळद मिक्स करून घ्या. तयार केलेला लेप संपूर्ण मानेवर लावून हलक्या हाताने मसाज करून घ्या. यामुळे मानेवर वाढलेले टॅनिंग कमी होईल आणि त्वचा सुंदर चमकदार दिसेल. १० मिनिटं मिश्रण मानेवर तसेच लावून ठेवा. त्यानंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय आठवडाभर नियमित केल्यास मान स्वच्छ होईल.

## पावसाळ्यात वारंवार सर्दी होते? साथीच्या आजारांपासून शरीराचा बचाव करण्यासाठी करा ‘हे’ घरगुती उपाय

देशभरात सगळीकडे पावसाने हजेरी लावली आहे. पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यानंतर साथीच्या आजारांमध्ये मोठी वाढ होते. सर्दी, खोकला, सतत ताप किंवा आरोग्यासंबंधित इतर समस्या उद्भवू लागतात. साथीचे आजार वाढू लागल्यानंतर आरोग्याची जास्त काळजी घ्यावी. या दिवसांमध्ये सतत बदलणारे वातावरण आरोग्य बिघडवण्यासाठी कारणीभूत ठरते. त्यामुळे पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यानंतर बाहेरील विकतचे तेलकट किंवा तिखट पदार्थ खाण्याऐवजी आहारात घरी बनवलेले पौष्टिक आणि पचनास हलके असलेले पदार्थ खावे. साथीच्या आजारांची लागण झाल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होऊन जाते. ज्यामुळे वारंवार चक्कर येणे, शरीरात सतत अशक्तपणा जाणवू लागतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पावसाळ्यातील साथीच्या आजारांपासून बचाव करण्यासाठी आहारात कोणते पदार्थ खावेत, याबद्दल सांगणार आहोत. या पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

लसूण: पावसाळ्याच्या दिवसांमध्ये लसूण खाण्यास जास्त प्राधान्य द्यावे. कारण लसणीमध्ये असलेले गुणधर्म साथीच्या आजारांपासून शरीराचा बचाव करतात. ककान किंवा घशाचे इन्फेक्शन टाळण्यासाठी लसणीच्या पाकळ्या



ठेचून कानाच्या वरच्या भागावर ठेवाव्या. या पाकळ्या ठेवल्यानंतर त्या कानात जाणार नाहीत, याची योग्य काळजी घ्यावी. सर्दी किंवा खोकला लागल्यास तुपामध्ये लसूण पाकळ्या भाजून खाव्यात. यामुळे शरीरातील सर्व घाण बाहेरील पडून जाईल आणि साथीच्या आजारांपासून सुटका मिळेल. याशिवाय शरीरात वाढलेले इन्फेक्शन कमी करण्यासाठी लसूण पाकळ्या आणि टोमॅटोचा वापर करून सूप तयार करावे.

हळद: औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेली हळद अनेक आजारांवर गुणकारी आहे. यामध्ये अनेक आयुर्वेदिक गुणधर्म सुद्धा आढळून येतात. हळदीमध्ये आढळून येणारे जंतुनाशक गुणधर्म शरीरात विषाणू वाढू देत नाहीत. त्यामुळे पावसाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये हळदीच्या दुधाचे सेवन करावे. तसेच तुम्ही सकाळी उथळून रिकाम्या पोटी हळदीच्या पाण्याचे सुद्धा सेवन करू शकता. सर्दी, खोकल्यापासून कायमचा आराम मिळवण्यासाठी हळद अतिशय प्रभावी आहे.

घशात वाढलेली खवखव कमी करण्यासाठी हळदीच्या चहाचे सेवन करावे. टोपात पाणी गरम करून त्यात हळद टाकून मिक्स करा. त्यानंतर टोपातील पाण्याला उकळी उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाणी गाळून घ्या. त्यानंतर त्यात मध आणि लिंबाचा रस मिक्स करून सेवन करा. यामुळे घश्यात वाढलेली खवखव कमी होईल आणि तात्काळ आराम मिळेल.

आयुर्वेदिक काढा: पावसाळ्यात सर्वच घरांमध्ये काढा बनवला जातो. काढ्याचे सेवन केल्यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक आणि विषाणू बाहेर पडून जातात. त्यामुळे पावसाळ्यात नियमित काढा प्यावा. गवती चहा, आलं, लवंग, काळामिरी व दालचीनी इत्यादी अनेक मसाल्यांचा वापर करून बनवलेला काढा आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

## रमाई नगर येथील बेकायदेशीर फेरफार तात्काळ रद्द करण्यात यावा फेर रद्द न केल्यास ५ जून रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा दिला प्रशासनाला इशारा

केज/प्रतिनिधी केज येथील रमाई नगर येथील बेकायदेशीर फेरफार तात्काळ रद्द करण्यात यावा जर फेर रद्द न केल्यास ५ जून रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज बीड रोड लगत स.नं.३०/२ माता रमाई नगर मध्ये गेल्या अनेक वर्षापासून गोरगरीब नागरिक मजुरी करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत असून या ठिकाणी राहत आहेत परंतु या जागेची बेकायदेशीरपणे अदलाबदल केलेली आहे, सदर ठिकाणाची बेकायदेशीरपणे अदलाबदल करून केलेली रजिस्ट्री व फेरफार तात्काळ रद्द करण्यात यावा या मागणीचे लेखी निवेदन केज तहसीलदार यांना दलित चळवळीच्या वतीने देण्यात आलेले आहे. सर्वे नंबर३०/२ फेर घेण्यात येऊ नये याकरिता दलित चळवळीतील कार्यकर्ते व रमाई नगर येथील रहिवाशी नागरिकांनी मागील काही दिवसापूर्वी तहसीलदार यांना लेखी निवेदन दिले होते परंतु सदर सर्वे नंबर चा फेरफार घेण्यात आलेला आहे,सदर फेरफार हा ५ जून पर्यंत रद्द न केल्यास दलित चळवळीतील कार्यकर्ते व माता रमाई नगर येथील रहिवासी नागरिक सर्वजण मिळून सामूहिक आत्मदहन करणार असल्याचे आशयाचे लेखी निवेदन केज तहसीलदार यांना देण्यात आले आहे. रमाई नगर येथील रहिवाशी नागरिक व दलित चळवळीतील कार्यकर्त्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील असे माध्यमांशी बोलताना कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. या लेखी निवेदनावर लखन हजारे,रोहित कसबे,प्रवीण मस्के,अशोक गायकवाड,शरद धिवार,योगेश गायकवाड,निलेश साखरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# आ. रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त पानगाव येथील रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद

लातूर :- - ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन भाजपाचे युवा नेते मा. ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते झाले.

भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने भारतीय जनता पार्टी आणि आ. रमेशअप्पा कराड मित्र मंडळाच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ठीक ठिकाणी विविध विधायक उपक्रम राबवले जात असून रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथे बुधवारी सकाळी युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या शुभहस्ते रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आला याप्रसंगी निश्चित केल्याप्रमाणे ५८ जणांनी रक्तदान केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड




यांच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेचा लाभ समाजातील गोरगरीब गरजूंना कार्यकर्त्यांनी मिळून द्यावा असे त्यांनी बोलून दाखवले. यावेळी सतीश आंबेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. रमेशअप्पा कराड यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनामे मामा, मंडलाध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, सुकेश भंडारे, श्रीकृष्ण जाधव, गणेश तूरूप, गोपाळ शेंडगे, अमर चव्हाण, ललिता कांबळे, शीला आचार्य, भागवत गीते, शिवाजी जाधव, मारुती गालफाडे, राम भंडारे, नाथराव गीते, बाळू भंडारे, संतोष तूरूप, भूषण संपत्ते, इस्माईल मनियार, रमाकांत संपत्ते, आकाश ढोणे, दिगंबर येडले, रमाकांत वाघमारे, गोविंद नरहरी, शेख शफिक, अरुण कांबळे, ज्ञानेश्वर पांचाळ, भागवत गडगिळे, हरिभाऊ रजपूत, संजय सरनागिरे, इलाई शेख, अविनाश मोटाडे, नवनाथ पांचाळ, मनोज दुट्टे, विष्णू शिरसाट यांच्यासह इतर अनेकजण मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबुराव कस्तुरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीरेंद्र चव्हाण यांनी केले.

# आपत्कालीन स्थितीत संपर्कासाठी मनपाच्या अधिकाऱ्यांची यादी जाहीर

लातूर /प्रतिनिधी :- पावसाळा सुरु होताच मनपाच्या वतीने आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. अशा स्थितीत नागरिकांना कसल्याही अडचणी येऊ नयेत यासाठी अधिकाऱ्यांची यादी आणि मोबाईल क्रमांक मनपाकडून जाहीर करण्यात आले आहेत. मंगळवारी लातूर शहर व परिसरात जोरदार पाऊस झाला. त्यानंतर काही भागात आपत्कालीन स्थिती निर्माण झाली होती, हे लक्षात घेता बुधवारी पालिकेच्या वतीने तातडीने ही कार्यवाही करण्यात आली. शहरातील नागरिकांना कोणत्याही वेळी संपर्क साधता यावा यासाठी टोल फ्री क्रमांक देण्यात आला आहे. संकटकाळी नागरिकांनी १८००२३३१३८८ हा टोल फ्री क्रमांक व ०२३८२- २५५५८५ या लँडलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक देविदास जाधव यांनी केले आहे. याशिवाय शहरातील प्रत्येक झोनसाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी देण्यात आली आहे.यात मनपा आयुक्तांनीही आपला ९४२२९३६६९९ हा क्रमांक आपत्कालीन सेवेसाठी जाहीर केला आहे.याशिवाय अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर (क्रमांक - ९९२२४२३१२२), नियंत्रण कक्ष अधिकारी रवि कांबळे (९९७०९६४४५३), ए झोन साठी क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सन्मती मेस्त्री (७८८७९९७११६), बी झोन साठी क्षेत्रीय अधिकारी संतोष लाडलापुरे (९४२३७१९००१),सी झोन साठी समाधान सूर्यवंशी (९४०४२२५३७९),डी झोन साठी विजय राजुरे (९१७२३९९१७७), या क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय मुख्य स्वच्छता निरीक्षकांचे दूरध्वनी क्रमांकही मनपाकडून जाहीर केले गेले आहेत. ए झोनचे मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे ( ९९७०९६४४५३ ), झोनचे धोंडीबा सोनवणे (९०२८८४७४००), सी झोनचे शिवराज शिंदे (८८८८२२८३०६) व डी झोनचे अक्रम शेख ( ८२०८३८३४५२) यांचे दूरध्वनी देण्यात आले आहेत. नागरिकांनी आपत्कालीन स्थितीत या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक देविदास जाधव यांनी केले आहे.

# लातूरमध्ये मान्सूनपूर्व अतिवृष्टीचा फटका; माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या आवाहनानंतर काँग्रेस पदाधिकारी, प्रशासनासह लातूरकरांच्या मदतीला

लातूर / प्रतिनिधी :- लातूरमध्ये मान्सूनपूर्व अतिवृष्टीने घरांमध्ये पाणी शिरले, रस्ते जलमय झाले. अशा संकटाच्या काळात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केलेल्या आवाहनाने लातूरकरांना दिलासा मिळाला. त्यांच्या सूचनेनुसार काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बूथ प्रमुख आणि प्रशासकीय कर्मचारी नागरिकांच्या मदतीला धावले, त्यांनी एकजुटीने मदतकार्य सुरू केले. स्वच्छता अभियान, पंचनामे आणि प्रशासनासोबतच्या समन्वयामुळे विस्कळीत झालेले जनजीवन आता हळूहळू पूर्वपदावर येत आहे. लातूर शहर व परिसरात काल (मंगळवार, २७ मे) दुपारनंतर झालेल्या मान्सूनपूर्व अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. शहराच्या सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते, तर रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहत होते. अनेक खोलगट भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. या पार्श्वभूमीवर, राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तातडीने जिल्हा प्रशासन आणि महापालिका यंत्रणेला नागरिकांची काळजी घेण्याचे निर्देश दिले होते. तसेच, त्यांनी लातूर शहरातील सर्व माजी नगरसेवक, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथ प्रमुख यांना आपापल्या परिसरात नागरिकांना मदत करण्यासाठी पुढे येण्याचे कळकळीचे आवाहन केले होते. आमदार देशमुख यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, आज बुधवार दि. २८ मे रोजी दिवसभर लातूर शहरातील सर्व माजी नगरसेवक, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, प्रभाग अध्यक्ष, प्रभाग निरीक्षक, बूथ प्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते व कार्यलयीन प्रभाग समन्वयक कर्मचारी यांनी मान्सुनपुर्व पावसामुळे विस्कळीत झालेले जनजीवन सुरळीत करण्यासाठी मदत केली. त्यांनी लातूर






शहरातील सर्व १८ प्रभागात आणि २७ गावांमध्ये नागरिकांना तसेच प्रशासनाला झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी मदत करण्यात येत आहे. मनपा आणि ग्रामपंचयातच्या मदतीने स्वच्छता, साफसफाई, नालेसाफसफाई मोहीम राबवली जात आहे. यामध्ये आज बुधवार दि. २८ मे २५ रोजी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी प्रशानाच्या मदतीने नागरीकांना मदत केली. लातूर शहरातील तेली गल्ली, जुना औसा रोड, बांधकाम भवन परीसर, शास्त्री नगर, अजम नगर, इस्लामपूरा, खाडगावरोड परीसर, लक्ष्मी कॉलनी, श्रीराम चौक, दादोजी कोंडदेव नगर, अक्षरधाम कॉलनी, उस्मानपूरा, अन्सार कॉलनी, विलासनगर, साळे गल्ली, सिध्देश्वर वेस परीसर, गावभाग, ६० फुट रोड परीसर, सिध्दार्थ सोसायटी, मोहन नगर, ताजोददीनबाबा नगर, एकमिनार मश्जिद परीसर, जयनगर, हत्तेनगर, नांदेडनाका परीसर, वैशालीबौध्द वीहार परीसर, बौध्दनगर, विठठल रुक्मणीनगर, रामरहीम नगर, केशव नगर, देशपांडे गल्ली, आझाद चौक, खडक हनुमान, प्रकाश नगर, विजयनगर, झीनत सोसायटी भैय्यासाहेब नगर, बालाजी नगर, अंजली नगर, ऊस्मानपूरा, दिनानाथ नगर, गॅलक्सी हॉस्पिटल, खोरी गल्ली, अयोध्या नगर, महाराणा प्रतापनगर, प्रबुद्ध नगर, अंजली नगर या भागात विशेष करुन नागरीक आणि प्रशासनाला मदत केली. १५ मधील सर्व २ मोठे आणि ११ छोटे नाले यांची जेसीबीच्या सहाय्याने स्वच्छता करण्यात आली. याकामात उपआयुक्त, क्षेत्रीय अधिकारी, मुख्य स्वच्छता अधिकारी, मनपा स्वच्छता निरीक्षक तसेच मनपा स्वच्छता विभागाचे कर्मचारी सक्रीय राहीले. या सर्व कामाचे नियोजन मदत करण्यासाठी ड. किरण जाधव, ड. समद पटेल, ड. दिपक सुळ, सचिन बडडापले, अहमदखा पठाण, सागर मुसाडे, प्रविण घोटाळे, विजयकुमार साबदे, फारुख शेख, दगडूअप्पा मिटकरी, प्रविण सुर्यवंशी, युनुस मोमीन, तबरेज तांबोळी, सुमीत खंडागळे, कैलास कांबळे, अहमदखा पठाण, विजय गायकवाड, रवीशंकर जाधव, पंडीत कावळे, सपना किसवे, गाजी पठाण, धनजंय शेळके, गोरोबा लोखंडे, आयुब मणियार, पप्पू देशमुख, पुनीत पाटील, संगीता कस्पटे, कुणाल वागज, अतिक बासले, राजेश कासार, निमीन स्वामी, असिफ बागवान, पिराजी साठे, नितीन कांबळे, इम्रान सय्यद, प्रा.संजय जगताप, राज क्षिरसागर, असलम शेख, अभिषक पतंगे, विष्णूदास धायगुडे, मुन्वर शेख, अरिफ शेख, फारुक शेख, पवन गायकवाड, अमजद शेख, मंदीप सवई, राजू गवळी, अमोल गायकवाड, नवाब शेख, अशुतोष मुळे, अजय वाघदरे, नजीर शेख, बबन शिंदे, समिर पठाण, संतोष जाधव, रफीक शेख, आदीनी केली आहे. या मदतीमुळे नागरिकांना दिलासा मिळत असून, काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संकटकाळात केलेल्या कार्याचे कौतुक होत आहे.

# शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान

## लातूर जिल्ह्यातील २२ कार्यालयांचा समावेश

लातूर :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या लातूर जिल्ह्यातील २२ शासकीय कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विभागस्तर आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त मंगेश शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मूल्यमापनात लातूर येथील ३ विभागस्तरीय कार्यालये आणि ४ जिल्हास्तरीय कार्यालयांनी राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामध्ये लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक उपसंचालक कार्यालयाने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. पशुसंवर्धन विभागामध्ये लातूर येथील सहआयुक्त, पशुसंवर्धन यांच्या कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच परिवहन विभागामध्ये लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.





जिल्हा कार्यालयांमध्ये पशुसंवर्धन विभागात लातूर जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला, तर माहिती व जनसंपर्क विभागात लातूर जिल्हा माहिती कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. यासोबतच सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये लातूर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयाने, तसेच लातूर जिल्हा कारागृह अधीक्षक यांच्या कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

पहिल्या टप्प्यात उदगीर उपविभागीय कार्यालयाने विभागात द्वितीय, चाकूर तहसीलदार कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. यासोबत, औसा नगरपरिषद, लातूर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे लातूर उपविभागीय अभियंता कार्यालय, खरोळा पशुधन विकास अधिकारी, औसा सार्वजनिक बांधकाम विभाग उप अभियंता कार्यालय, किल्लारी ग्रामीण महावितरण उपविभागीय अभियंता कार्यालय, लातूर उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, औसा दुय्यम निबंधक कार्यालय, अहमदपूर तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालय यांनीही या मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या सर्व कार्यालयांचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत लातूर जिल्ह्यातील २२ कार्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी कली असून जिल्हा प्रशासनासाठी ही बाब अभिमानास्पद आहे. यापुढेही सर्वच शासकीय कार्यालयांनी चांगली कामगिरी करून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालय प्रमुखांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

# निर्मला गवित यांचा उद्धव ठाकरेंना जय महाराष्ट्र करत शिंदेसेनेत प्रवेश



नाशिक : उद्धवसेनेला गेल्या काही महिन्यात सत्ताधारी पक्षांकडून विशेषत: शिवसेना शिंदे गट आणि भाजपकडून खिंडार पाडले जात आहे. अनेक मातब्बर नेत्यांनी भाजप व शिंदेसेनेत पक्षात प्रवेश केला आहे. आता नाशिकमधून उद्धवसेनेला शिंदेसेनेने धक्का दिला असून इगतपुरीच्या माजी आमदार निर्मला गावित यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला.

दोन दिवसापूर्वीच नाशिकचे माजी आमदार नरेंद्र दराडे यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आता महिला नेत्या निर्मला गावितांनी पक्षाला रामराम केला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा पक्षप्रवेश होत आहे. गावित या इगतपुरी मतदारसंघातून दोन टर्म आमदार होत्या. २०१९ मध्ये त्यांनी उद्धवसेनेत प्रवेश केला होता. मात्र त्यांचा विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. निर्मला गावित यांचे वडील माणिकराव गावित हे सलग ९ वेळा लोकसभेचे खासदार झाले होते. कोण आहेत निर्मला गावित? निर्मला गावित या मूळच्या काँग्रेसवासी आहेत. त्यांच्या राजकारणाची सुरुवात काँग्रेसमधून झाली आहे. त्या ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि माजी केंद्रीय मंत्री दिवंगत माणिकराव गावित यांच्या कन्या आहेत. निर्मला गावित या दोनवेळा आमदार राहिल्या आहेत.

# सोनीजवळा येथील कोकाटे वस्ती साठी आलेली डिपी वस्तीवर बसवा - नागरिकांची मागणी खासदार साहेब तुम्ही डिपी उपसरपंच ला दिला का वस्तीवरील नागरीकांना एकदा येऊन बघाच!

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सोनीजवळा येथील कोकाटे वस्तीसाठी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी एनएससी योजनेतून कोकाटे वस्तीवर नागरीकांना घरेलु उपयोग होवा यासाठी डिपी उपलब्ध करून दिला पण सोनिजवळा येथील विद्यमान उपसरपंच व त्यांच्या नातेवाईकांनी आम्ही खर्च करून डिपी आनला आहे आसा भास करुन येथील नागरिकांना अंधारात ठेवून स्वताच्या फायद्यासाठी डिपी वस्तीवर न बसवता आपल्या शेतातील विहीरीवर बस ऊन शेती साठी उपयोग करत आहेत , सदरील डिपी काढून वस्तीवर बसविण्यात यावा नियमानुसार कोटेशन भरून वस्तीवरील नागरिकांना वीज कनेक्शन देण्यात यावे या मागणीचे लेखी निवेदन कनिष्ठ अभियंता महावितरण कार्यालय केज येथे दिले आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा करून सोनीजवळ येथील कोकाटे वस्तीसाठी एनएससी योजनेतून २५ के. व्ही. चा ट्रांसफार्मर डीपी मंजूर करून आणला आहे. सदर डीपी मंजुरीसाठी कसल्याच प्रकारचा खर्च झालेला नाही खासदार सोनवणे यांनी निशुल्क सदर डीपी मंजूर करून आणलेला आहे परंतु उपसरपंच यांचे नातेवाईक येथील नागरिकांना अरेरावी व दादागिरी करून पैशाची मागणी करत आहेत वीज कनेक्शन घेण्यासाठी २५ हजार रुपयाची मागणी करत असल्याचे येथील नागरिकांनी बोलताना सांगितले आहे, उपसरपंच व त्यांच्या नातेवाईकांनी स्वतःच्या फायद्यासाठी त्यांच्या शेतामध्ये डीपी बसवला आहे. उपसरपंच व त्यांच्या नातेवाईकांच्या शेतातील डीपी काढून कोकाटे वस्तीवर बसवण्यात यावा व महावितरण कार्यालयाने नियमा नुसार कोटेशन भरून घेऊन कोकाटे वस्तीवरील नागरिकांना वीज कनेक्शन देण्यात यावे असे लेखी निवेदन महावितरण कार्यालयात दिले आहे या लेखी निवेदनावर गोविंद कोकाटे शिवाजी कोकाटे बालासाहेब कोकाटे भागवत कोकाटे लहू कोकाटे सोमनाथ कोकाटे ज्ञानोबा कोकाटे बबन कोकाटे यांच्या स्वाक्षरी आहेत. सदर मागणीचे लेखी निवेदन कनिष्ठ अभियंता अंडिल साहेब यांनी स्वीकारले आहे. यावेळी कनिष्ठ अभियंता अंडिल साहेब यांनी नागरिकांना आश्वासन दिले की, तात्काळ तुम्ही नियमानुसार कोटेशन भरून घ्या तुम्हाला वीज कनेक्शन जोडून देऊ व वीज कनेक्शन देण्याकरिता ज्यांनी पैशाची मागणी केली आहे त्यांच्या विरोधात आम्हाला पुरावा द्या आम्ही वरिष्ठांना तात्काळ अहवाल सादर करू असे आश्वासित केले.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE